

■ २२ कॅरेट सोने दर : १,२९,९००/- ■ चांदी दर : १,९०,०००/-

शब्दांना सत्याची धार

प्रहार



ज्युनियर राईट आर्म फायनल्समध्ये भारताला १२ पदके !

पान ८

सिंधुदुर्ग ● मंगळवार ३ नोव्हेंबर, २०२६ RNI Reg.No.: एमएएचएमएआर/२००८/३३७८७ ● वर्ष २२ ● अंक ३५० ● पाने ८ ● ₹ ५.००

https://prahaardigital.com/ epaper.prahaar.in

मतदार यादीतील घुसखोरांना काँग्रेसचे संरक्षण

- 'एसआयआर'ला विरोध करण्यावरून राहुल गांधींवर निशाणा
- प्रत्येक घुसखोराला देशाबाहेर काढण्याचा निर्धार

अमित शाहा यांचा आरोप



नवी दिल्ली

मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षणावरून (एसआयआर) सत्ताधारी भाजप आणि विरोधकांमधील संघर्ष तीव्र झाला आहे. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी आणि मतदार याद्यांमधील कथित गैरप्रकारांच्या निषेधार्थ इंडिया आघाडीने १ नोव्हेंबर रोजी दिल्लीतील रामलीला मैदानावर महामोर्चा काढला होता. या मोर्चांत काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्यावर टीका केली होती.

या मोर्चाला प्रत्युत्तर म्हणून भाजपने सोमवारी (२ नोव्हेंबर) हैदराबादमध्ये 'लोकतंत्र बचाओ, अराजकता हटाओ' महारॅलीचे आयोजन केले. या सभेत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी राहुल गांधी यांच्यासह विरोधी पक्षांवर जोरदार टीका केली. काँग्रेस मतदार यादीतील घुसखोरांना संरक्षण देत असल्याचा आरोप करत, (पान २ वर)



'रिजिम चेंज'च्या आडून संविधान आणि लोकशाही संपवण्याचा डाव

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस; संविधानावरील संकट दूर होईपर्यंत माघार नाही

मुंबई

"देशातील सरकार बदलणे हा लोकशाहीने दिलेला अधिकार असला, तरी राजकीय व्यवस्था आणि संविधान बदलण्याच्या उद्देशाने 'रिजिम चेंज'चे षडयंत्र रचले जात आहे. काँग्रेस आणि इंडिया आघाडीतील नेते आंतरराष्ट्रीय षडयंत्राचा भाग बनून देशातील लोकशाही संस्था बदनाम करत आहेत. बांगलादेश, नेपाळ आणि श्रीलंकेप्रमाणे भारतातही राजकीय व्यवस्था बदलण्याचा त्यांचा प्रयत्न आहे", असा आरोप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी केला. मात्र, रक्ताचा शेवटचा थेंब असेपर्यंत देशाचे संविधान आणि लोकशाहीला धक्का लागू देणार नाही, असा निर्धारही त्यांनी व्यक्त केला. भाजप महायुतीच्या वतीने मुंबईत आयोजित 'लोकतंत्र बचाओ, अराजकता हटाओ' आंदोलनात ते बोलत होते.

या आंदोलनात केंद्रीय राज्य मंत्री आणि रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे (आठवले) राष्ट्रीय अध्यक्ष रामदास आठवले, (पान २ वर)

...तर हिंदूंना एकत्र यावेच लागेल!

मंत्री नितेश राणे; 'लोकतंत्र बचाओ अराजकता हटाओ' पदयात्रेत काँग्रेस आणि इंडिया आघाडीवर टीका



मुंबई

बांगलादेशी, रोहिंग्यांसह सर्व 'घाण' मुंबई आणि महाराष्ट्रातून साफ करायची असेल, तर हिंदूंनी एकत्र येणे आवश्यक आहे, असे मत राज्याचे मत्स्यव्यवसाय आणि बंदरे विकासमंत्री नितेश राणे यांनी सोमवारी व्यक्त केले. भाजप महायुतीच्या वतीने आयोजित 'लोकतंत्र बचाओ अराजकता हटाओ' पदयात्रेत ते बोलत होते. सत्ता मिळण्याची शक्यता दिसत नसल्याने काँग्रेस आणि इंडिया आघाडीतील नेते देशविरोधी प्रवृत्तींशी हातमिळवणी करून अराजकता निर्माण करण्याचा प्रयत्न करत (पान २ वर)

शरद पवार यांची प्रकृती बिघडली



पुणे (प्रतिनिधी)

राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांना खोकल्याचा त्रास जाणवू लागल्याने पुण्यातील रुबी हॉल क्लिनिक रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. त्यांच्या वैद्यकीय तपासण्या सुरू असून, प्रकृती स्थिर असल्याची माहिती खासदार सुप्रिया सुळे यांनी समाजमाध्यमावरील पोस्टद्वारे दिली. 'बाबांना खोकल्याचा त्रास झाल्यामुळे रुग्णालयात दाखल केले आहे. सध्या त्यांच्या वैद्यकीय तपासण्या सुरू असून, आरोग्यविषयक सर्व मापदंड स्थिर आहेत,' (पान २ वर)

राज्यभरातील न्यायालयांना बॉम्बची धमकी ; सिंधुदुर्गातही खळबळ !

धमकीचा ई-मेल ठरला अफवा; बॉम्बशोधक पथकाची न्यायालयात कसून तपासणी

सिंधुदुर्गनगरी (प्रतिनिधी)

राज्यभरातील न्यायालय उडवून देण्याची धमकीवजा ई-मेल प्राप्त झाल्याने सर्वत्र खळबळ उडाली. याच प्रकारचा ई-मेल सिंधुदुर्ग जिल्हा न्यायालयालाही प्राप्त झाल्याने न्यायालय प्रशासन आणि पोलीस यंत्रणेची धावपळ उडाली. मात्र, बॉम्बशोधक पथकाने केलेल्या कसून तपासणीत कोणतीही संशयास्पद वस्तू किंवा बॉम्ब आढळून आला नाही. त्यामुळे सिंधुदुर्ग जिल्हा न्यायालयातील बॉम्बची धमकी अखेर अफवाच ठरली. सोमवारी दुपारी तीन वाजता ही धडकी भरणारी मोहीम सिंधुदुर्ग पोलिसांनी जिल्हा न्यायालय परिसरात राबवत तपासणी केली.

न्यायालयाचे नियमित कामकाज सुरू असतानाच हा धमकीचा ई-मेल



प्राप्त झाला. 'खलिस्तान नॅशनल आर्म'च्या नावाने जिल्हा न्यायालय प्रशासनाच्या मेलवर दुपारी ३.०६ वाजता हा संदेश आला होता व त्यात ३.११ मिनिटांनी न्यायालय उडविणार असे नमूद केले होते. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन सिंधुदुर्ग पोलीस दलाला तातडीने पाचारण करण्यात आले. जिल्हा पोलीस दलाचे बॉम्बशोधक पथक व श्वान पथक तसेच पोलीस अधिकारी आणि कर्मचारी तत्काळ न्यायालय परिसरात दाखल झाले. अपर पोलीस अधीक्षक तात्काळ घटनास्थळी दाखल झाल्या. खबरदारीचा उपाय म्हणून सर्व न्यायाधीश, अधिकारी, कर्मचारी, वकील आणि न्यायालयात आलेल्या (पान २ वर)

उमर अब्दुल्ला सरकारसमोर राजकीय पेच

नॅशनल कॉन्फरन्सचे २५ आमदार नाराज; मागण्या मान्य न झाल्यास पाठिंबा काढण्याचा इशारा

जम्मू-काश्मीर

उमर अब्दुल्ला यांच्या नेतृत्वाखालील नॅशनल कॉन्फरन्स सरकारसमोर पक्षांतर्गत नाराजीचे आव्हान उभे राहिल्याचा दावा केला जात आहे. पक्षातील २५ नाराज आमदारांच्या गटाने नेतृत्वाला १४ दिवसांची मुदत दिल्याचे समजते. या काळात मागण्या मान्य न झाल्यास राजभवनावर जाऊन सरकारचा पाठिंबा काढण्याचा इशारा या आमदारांनी दिल्याचे सूत्रांनी सांगितले.

सध्याच्या सर्व मंत्र्यांना पदावरून हटवावे आणि मुख्यमंत्र्यांच्या सल्लागाराचीही हकालपट्टी करावी, अशी या आमदारांची मागणी आहे. त्यानंतर सर्व आमदारांशी चर्चा करून नव्याने मंत्रिमंडळ स्थापन करावे, तसेच योग्यतेच्या आधारे आणि पारदर्शक पद्धतीने मंत्र्यांची निवड करावी, अशी त्यांची भूमिका आहे. (पान २ वर)

स्वदेशी लढाऊ विमाने, ड्रोनविरोधी यंत्रणेवर भर

- हवाई दलाची युद्धसज्जता वाढविण्याला सर्वोच्च प्राधान्य
- नवे हवाई दलप्रमुख आशुतोष दीक्षित यांची 'वायू' संकल्पना

नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

चीन आणि पाकिस्तानकडून निर्माण होणाऱ्या दुहेरी सुरक्षा आव्हानांच्या पार्श्वभूमीवर भारतीय हवाई दलाची युद्धक्षमता अधिक मजबूत करण्यासाठी स्वदेशी लढाऊ विमाने, अत्याधुनिक हवाई संरक्षण यंत्रणा आणि ड्रोनविरोधी तंत्रज्ञानाच्या विकासावर भर दिला जाणार आहे. लढाऊ विमानांची संख्या मंजूर क्षमतेपर्यंत वाढविणे आणि कोणत्याही संभाव्य संघर्षाला तोंड देण्यासाठी हवाई दलाला सज्ज ठेवणे हे आपले सर्वोच्च प्राधान्य असेल, असे नवे हवाई दलप्रमुख एअर चीफ मार्शल आशुतोष दीक्षित यांनी स्पष्ट केले.



हवाई दलप्रमुखपदाची सूत्रे स्वीकारल्यानंतर आयोजित मानवंदना समारंभात त्यांनी हवाई दलाच्या भविष्यातील वाटचालीसाठी 'वायू' ही चार सूत्रांवर आधारित संकल्पना मांडली. सज्जता, आत्मनिर्भरता, नवकल्पना आणि संयुक्त प्रयत्न या चार प्रमुख आधारस्तंभांवर भारतीय हवाई दलाची क्षमता वाढविण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. बदलत्या युद्धतंत्रज्ञानाचा विचार करून हवाई दलाच्या कार्यपद्धतीत आणि संरक्षण क्षमतेत आवश्यक बदल केले जातील, असेही त्यांनी सांगितले.

लढाऊ विमानांची संख्या वाढविण्याचे आव्हान

भारतीय हवाई दलासमोरील प्रमुख आव्हान म्हणजे लढाऊ विमानांच्या (पान २ वर)

'इंडिया' आघाडीच्या रॅलीमुळे १० हजार कोटींचे नुकसान

व्यापारी संघटनेचा आरोप; दिल्लीतील २.५ लाख दुकाने बंद

नवी दिल्ली

दिल्लीतील रामलीला मैदानावर १ नोव्हेंबर रोजी झालेल्या 'इंडिया' आघाडीच्या महारॅलीमुळे राजधानीतील व्यापारी व्यवहारांवर परिणाम झाल्याचा दावा 'चेंबर ऑफ ट्रेड अँड इंडस्ट्री'ने (सीटीआय) केला आहे. या रॅलीमुळे २० ते २५ प्रमुख बाजारपेठांमधील सुमारे अडीच लाख दुकाने बंद राहिली. परिणामी, व्यापाऱ्यांचे १० हजार ते ११ हजार कोटी रुपयांचे नुकसान झाल्याचा आरोप संघटनेने केला आहे.

सीटीआयचे अध्यक्ष ब्रिजेश गोयल यांनी दिलेल्या माहितीनुसार, रॅलीच्या परिसरातील सुमारे तीन लाख दुकानांपैकी ८० टक्के दुकाने बंद होती. वाहतूक निर्बंध, गर्दी आणि ग्राहकांना येणाऱ्या अडचणींमुळे व्यापाऱ्यांनी (पान २ वर)

महाराष्ट्राच्या सागरी क्षेत्रात गुंतवणुकीच्या व्यापक संधी; गुंतवणुकदारांसाठी राज्य सज्ज - बंदरे मंत्री ना.नितेश राणे

एफसीसीआयच्या वतीने चौथ्या मेरिटाइम इंडिया कॉन्फरन्स अँड एक्स्पोचे आयोजन

मुंबई (प्रतिनिधी)

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र बंदर, शिपिंग, लॉजिस्टिक्स आणि निर्यात क्षेत्रातील क्षमता जागतिक स्तरावर विस्तारण्याच्या दिशेने वाटचाल करीत आहे. राज्याच्या बंदर व सागरी क्षेत्रात गुंतवणुकीच्या व्यापक संधी उपलब्ध असून, जागतिक गुंतवणूकदारांसाठी महाराष्ट्र सज्ज असून राज्यात गुंतवणूक करून



उद्योग उभारावेत आणि जागतिक सागरी अर्थव्यवस्थेतील भारताच्या प्रगतीचे भागीदार व्हावे, असे आवाहन मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांनी फिक्कीच्या व्यासपीठावरून केले.

फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीच्यावतीने ४थ्या मॅरिटाइम इंडिया कॉन्फरन्स अँड एक्सपोचे आयोजन नेस्को, गोरेगाव येथे २ ते ४ नोव्हेंबर २०२६ (पान २ वर)

जिल्हा परिषदेच्या प्रवेशद्वारावर दिवाळी फराळाचा सुगंध!

- महिला बचत गटांच्या फराळ विक्री महोत्सवाला उत्साहात सुरुवात
- अध्यक्ष प्रमोद कामत, सीईओ डॉ.अपूर्वा बासुर यांची उपस्थिती

सिंधुदुर्गनगरी (प्रतिनिधी)

दिवाळीचा उत्साह, फराळाचा दरवळ आणि महिला बचत गटांच्या स्वावलंबनाचा आनंदी सोहळा... अशा उत्साहपूर्ण वातावरणात सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेचे प्रवेशद्वार सोमवारी दिवाळीमय (पान २ वर)

